# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर</u>
## भरती प्रक्रिया सन-२०२४
## <u>पदाचे नाव - सफाईगार</u>

लातूर जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवरील ''सफाईगार'' या पदाकरीता १० (दहा) उमेदवारांची निवडसूची अणि ०३ (तीन) उमेदवारांची प्रतिक्षासूची तयार करण्यासाठी, वेतनश्रेणी एस-१ रु.१५०००-४७६००/- अधिक नियमानुसार देय भत्ते या वेतनश्रेणीत पात्र उमेदवारांकडून ऑफलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

विस्तृत/सविस्तर जाहिरात विहीत अर्जाच्या नमुन्यासह, जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर यांचे अधिकृत संकेतस्थळ **https://latur.dcourts.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक ३०/०४/२०२४ च्या सकाळी ११ वा. पासून उपलब्ध राहिल. सदरचा नमुना डाउनलोड करता येईल.

पात्र उमेदारांनी जाहिरातीमध्ये दिलेल्या नमुन्यातील अर्ज व त्यासोबत कागदपत्राच्या स्वप्रमाणित प्रती नोंदणीकृत पोच देय डाकेने/पत्रा द्वारे म्हणजेच **RPAD** किंवा शिघ्र डाक सेवा पोच पावतीसह म्हणजेच **Speed Post** द्वारे या कार्यालयास पाठवावेत. तसेच लिफाफ्यावर सफाईगार या पदासाठी अर्ज असे नमुद करावे. कोणत्याही परिस्थितीत हस्तप्रेक्षणाद्वारे म्हणजेच **"<u>By Hand</u>"** अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. अपूर्ण अर्ज नामंजूर करण्यात येतील याचीही नोंद घ्यावी. तसेच मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याचीही नोंद घ्यावी. अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख १४/०५/२०२४ सायंकाळी ६:०० पर्यंत आहे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

विस्तृत जाहिरात अर्जाच्या नमुन्यासह जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर यांच्या **https://latur.dcourts.gov.in** या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जिल्हा न्यायालय, लातूर

दिनांक २९/०४/२०२४

( व्ही. व्ही. पाटील )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
<u>लातूर.</u>

* * *

MahaNMK.com

MahaNMK.com

जाहिरात दिनांक : २९/०४/२०२४
जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक : ३०/०४/२०२४
अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक : १४/०५/२०२४ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत.

# जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर

## जाहिरात

## दुरध्वनी कमांक ०२३८२-२४३५४४

जिल्हा न्यायलय, लातूर च्या आस्थापनेवरील "सफाईगार (Sweeper)" या पदाकरीता उमेदवारांची निवड सुची व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवारांनी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यातील अर्ज नोंदणीकृत डाकद्वारे (RPAD) किंवा शिघ्र डाक सेवा (Speed Post) द्वारे खालील पत्त्यावर दिनांक १४/०५/२०२४ रोजी सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत अथवा त्यापूर्वी पोहोचतील असे पाठवावेत. या तारखेनंतर आलेले अर्ज कोणत्याही कारणास्तव विचारात घेतले जाणार नाहीत.

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर.

MahaNMK.com

सफाईगार : १) निवड सुचीसाठी सफाईगार पदाची संख्या - १० (दहा)
२) प्रतीक्षा सुचीसाठी सफाईगार पदाची संख्या - ०३ (तीन)

अर्हता : १) सुदृढ शरीरयष्टी आणि सफाईगार या पदाच्या कामासाठी सर्वार्थाने सक्षम असणे आवश्यक आहे.
२) स्वच्छतेबाबतची उपकरणे हाताळण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.

३) उमेदवाराला दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्मास आलेल्या मुलांची संख्या एकुण दोन पेक्षा जास्त नसावी.

४) अर्जदाराला कोणत्याही गुन्हयासाठी अटक किंवा दोषी ठरविले नसावे आणि त्याने/तिने/तिच्याविरुध्द फौजदारी खटला/तक्रार प्रलंबित असल्याचे किंवा फौजदारी खटला/तक्रार याचा निर्णय झालेला आहे असे, उघड केले पाहिजे.

<u>वयोमर्यादा</u> : अ) जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी शासनाने निर्दिष्ट केल्यानुसार, सर्वसाधारण प्रवर्गाच्या बाबतीत वय १८ वर्षापेक्षा कमी आणि ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

ब) योग्य मार्गाने अर्ज करणा-या राज्य/केंद्र सरकारी कर्मचा-याच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा लागू असणार नाही.

<u>कामाचे स्वरूप</u>:

अ) निवड झालेल्या उमेदवारांची, जेथे नियुक्ती केली जाईल, तेथील न्यायालय, इमारतीची, इमारतीच्या परिसराची, निवासस्थानाची व कार्यालयांच्या प्रसाधनगृहांची नियमीत स्वच्छता व साफसफाई करणे आणि निगा राखणे.

ब) न्यायालय इमारतीच्या आवारातील बागेची निगा राखणे.

क) वरील अ आणि ब मध्ये नमुद केलेल्या कामाव्यतिरीक्त न्यायिक अधिकारी आणि न्यायालयाचे प्रभारी अधिकारी यांच्या निर्देशानुसार आवश्यक ती सर्व कामे करणे.

<u>वेतनश्रेणी</u> : सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-१ रु. १५०००-४७६००/- अधिक नियमानुसार देय भत्ते.

MahaNMK.com

## उमेदवारांना सुचना :-

१. अर्ज करण्याची पध्दत :- जाहिरात, अर्ज व प्रमाणपत्र जिल्हा न्यायालय, लातूरचे संकेतस्थळ **https://latur.dcourts.gov.in** यावर उपलब्ध आहेत. त्या नमुन्यातच अर्ज व सोबतची प्रमाणपत्रे आणि कागदपत्रांच्या स्व:प्रमाणित प्रती अर्जासोबत सादर करावीत. कोणत्याही परिस्थितीत हस्तप्रेक्षणाद्वारे म्हणजेच By Hand अर्ज स्विकारले जाणार नाही. तसेच बंद पाकीटावर सफाईगार पदासाठी अर्ज असे नमुद नसलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

२. शासकीय कर्मचा-याने अर्ज कसा करावा - जे उमेदवार शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्या-त्या विभाग/कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेवूनच अर्ज सादर करावा.

३. उमेदवाराने जर निवड प्रकियेच्या संदर्भात स्वत: किंवा कोणामार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायिक विभागाच्या अधिका-यांना/ कर्मचा-यांस भेटण्याचा किंवा त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, त्यास अपात्र ठरविण्यात येईल. याबाबतीत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

४. उमेदवाराने त्याचे/तिचे अलीकडचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फोटो) अर्जावर दिलेल्या जागी लावुन त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी.

५. दोन सन्माननीय व्यक्तींनी जाहिरातीच्या तारखेनंतर दिलेले चारित्र्याचे दाखले सादर करावेत.

६. अर्जासोबत नमुना-अ मधील प्रतिज्ञापत्र जोडावे. तसेच नमुना घोषणाही जोडावी.

७. विहित नमुन्यात नसलेला आणि अपूर्ण माहिती असलेला अर्ज अपात्र ठरविणेत येईल.

MahaNMK.com

८. <u>अल्पसूची</u> :- सफाईगाराच्या भरती प्रकियेच्या वेळी जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास निवड समिती योग्य ते निकष लावून अर्हता/योग्यतेच्या आधारे सफाईगार पदासाठी अल्पसुची तयार करेल व अशी तयार केलेली अल्पसुची जिल्हा न्यायालय, लातूर येथील सूचना फलक व **https://latur.dcourts.gov.in** संकेतस्थळावर प्रसिध्द करेल.

९. अशी अल्पसुची तयार करण्याचे किंवा आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार निवड समितीने स्वत:कडे राखून ठेवलेले आहेत.

१०. <u>चापल्य व साफसफाई परिक्षा</u> :- सफाईगार पदासाठी अल्पसुचीत नमुद उमेदवारांची २० गुणांची चापल्य व साफसफाई कामाची मूल्यमापन परिक्षा घेण्यात येईल.

११. चापल्य व साफसफाई परिक्षेमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे, काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे, जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांच्या संख्येच्या ३ पट उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. १:३ हे गुणोत्तर राखण्यासाठी शेवटच्या उमेदवाराने मिळवलेल्या गुणांइतकेच गुण मिळवणारे एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. उमेदवारांची २० गुणांची तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

१२. उमेदवारांची निवड ही सफाईगार पदाच्या चापल्य व साफसफाई परिक्षा आणि तोंडी मुलाखतीत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार केली जाईल.

१३. उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीकरीता परीक्षा व मुलाखतीस बोलविल्यास स्व:खर्चाने हजर रहावे लागेल.

१४. सेवाप्रवेश प्रकियेबाबतची सर्व माहिती/सुचना/बदल जिल्हा न्यायालय, लातूर सूचना फलकावर व **https://latur.dcourts.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. परंतु कोणासही वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

MahaNMK.com

१५. वयाच्या पडताळणीसाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परिक्षेचा दाखला आवश्यक राहिल.

१६. सेवाप्रवेश प्रकियेचे वेळापत्रक वेळोवळी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर **https://latur.dcourts.gov.in** व नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

१७. लघुसूचित होण्यास पात्र ठरलेल्या उमेदवारांची नावे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर तसेच सुचनाफलकावर प्रसिध्द करण्यात येतील. पुढील चाचणीकरीता बोलावण्याबातची सुचना ही साध्या टपालाद्वारे दिली जाणार असल्यामुळे उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळास भेट देणे त्यांच्या हिताचे राहील. लघुसूची प्रसिध्द करतेवेळीच ओळखपत्राचा नमुना संकेतस्थळावर अपलोड केला जाईल याची नोंद घ्यावी.

१८. त्यांनतर ओळखपत्राचा नमुना उमेदवारांनी संकेतस्थळावरुन डाउनलोड करुन घेउन व्यवस्थित रित्या भरुन आणि त्यावर आपले नविनतम पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (अर्जासोबत पूर्वी सादर केलेले) चिकटवून आणि त्यावर दिलेल्या जागी काळया शाईने स्वाक्षरी करुन जिल्हा न्यायलयास दिलेल्या तारखांना सादर करावे आणि आपले प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे. प्रवेशपत्र असल्याशिवाय चापल्य परिक्षा व मुलाखतीस हजर राहण्यास परवानगी मिळणार नाही.

MahaNMK.com

जिल्हा न्यायालय, लातूर

दिनांक २९/०४/२०२४

( व्ही. व्ही. पाटील )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
लातूर.

MahaNMK.com

# अर्जाचा नमुना
# जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर
# सफाईगार पदासाठी अर्ज

| नोंदणी कमांक (कार्यालयीन उपयोगा करीता) | | | | | |
|---|---|---|---|---|---|

नुकतेच काढलेला पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फाटो स्वाक्षरी सहित)

| | | |
|---|---|---|
| १ | संपूर्ण नाव - श्री/श्रीमती/कुमारी | |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता पिनकोड सह | |
| ३ | कायमस्वरुपी संपूर्ण पत्ता पिनकोड सह | |
| ४ | राष्ट्रीयत्व | |
| ५ | अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय? | होय/नाही. |
| ६ | दूरध्वनी/भ्रमणध्वनी कमांक | |
| ७ | ई-मेल आयडी ( असल्यास ) | |
| ८ | लिंग : पुरुष/स्त्री/इतर | |
| ९ | धर्म/जात | |
| १० | जातीचा प्रवर्ग | |

| | | |
|---|---|---|
| ११ | जन्म दिनांक | |
| १२ | जहिरातीच्या तारखेस अर्जदाराचे वय | वर्षे महिने दिवस |
| १३ | उमेदवार विवाहित आहे काय? | होय/नाही. |
| १४ | हयात असलेल्या मुलांची संख्या | |
| १५ | २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या | |
| १६ | अर्जदार न्यायालयीन कर्मचारी आहे काय? असल्यास न्यायालयाचे नाव व पदनाम | |
| १७ | न्यायसंस्थेत कार्यरत असलेल्या नातेवाईकांचा संपूर्ण तपशिल | |
| १८ | शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास कार्यालयाचे नाव व नेमणूकीची तारिख. | |
| १९ | शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास, अर्जदार योग्य मार्गाने अर्ज सादर करत आहे का ? | होय/नाही. |
| २० | उमेदवार दिव्यांग आहे काय ? | होय/नाही.<br>( असल्यास तसा दाखला जोडावा ) |
| २१ | अवगत असलेल्या भाषा | |

२२. <u>शैक्षणिक अर्हता</u> :-

| अ. क. | शैक्षणिक अर्हता | परिक्षामंडळ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १) | | | | |
| २) | | | | |
| ३) | | | | |

२३. अनुभव :-

| अ. क. | अनुभव (संबंधित काम केलेल्या ठिकाणाचे/कार्यालयाचे नाव पत्ता ) | कालावधी | | एकूण (वर्ष, महिने व दिवस) |
|---|---|---|---|---|
| | | दिनांकापासून | दिनांकापर्यंत | |
| १) | | | | |
| २) | | | | |
| ३) | | | | |

२४. इतर विशेष अर्हता :-

२५.

अ. उमेदवाराविरुध्द कोणतीही फौजदारी कार्यवाही प्रलंबित आहे का? : होय/नाही.
( असल्यास माहिती जोडावी. )

ब. त्याला/तिला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले आहे काय? : होय/नाही.

क. तो/ती शिस्तभंगाच्या चौकशीला सामोरे जात आहे का : होय /नाही.

२६. कोणत्याही न्यायालय/एम.पी.एस.सी./यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडीमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमस्वरुपी प्रतिबंधित केले आहे का ?

२७. <u>उमेदवाराला चारित्र्याचे दाखले दिलेल्या व्यक्तींची नावे व पत्ता:</u>

१. ...........................................................................
...........................................................................

२. ...........................................................................
...........................................................................

मी याद्वारे प्रमाणित करतो / करते की, माझे माहितीप्रमाणे वरील तपशील सत्य आणि अचूक आहे. यातील कोणतीही माहिती चूक/खोटी आढळल्यास मी निवड प्रक्रियेसाठी अपात्र ठरेल आणि माझी निवड/नेमणूक झाल्यास माझी सेवा कोणतीही नोटीस न देता संपुष्ट करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक ...../...../२०२४. अर्जदाराचे नाव व सही

अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशील खालीलप्रमाणे :

१. ..................................................................................................
२. ..................................................................................................
३. ..................................................................................................
४. ..................................................................................................
५. ..................................................................................................
६. ..................................................................................................
७. ..................................................................................................
८. ..................................................................................................
९. ..................................................................................................
१०. ..................................................................................................

# नमुना 'अ'
## प्रतिज्ञापत्र

मी, श्री/श्रीमती/कुमारी.......................................................श्री/श्रीमती ..................................................यांचा मुलगा/मुलगी/पती/पत्नी, वय..............वर्षे, राहणार................................................, याद्वारे पुढील प्रमाणे जाहिर करतो/करते की,

१. मी, 'सफाईगार' या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२. आज रोजी मला..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .......... आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

४. मी असेही जाहीर करतो/करते की, माझेविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही किंवा माझेविरुध्द फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावलेली नाही किंवा माझेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही झालेली नाही.

५. या जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व सूचना व अटी मला मान्य आहेत.

स्थळ :

दिनांक : अर्जदाराचे नाव व सही

# नमुना 'ब'

## चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ..........................................हे/हया..........................................तालुका ............................ जिल्हा .............................. येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील ................ वर्षापासून ओळखतो. त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे.

सबब हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

स्थळ :

दिनांक :

प्रमाणपत्र देणा-याचे नाव व सही
पत्ता : ...............................
..........................................
..........................................
भ्रमणध्वनी क्र.

# <u>घोषणा</u>

मी वर नमुद उमेदवार याद्वारे शपथपूर्वक घोषीत करतो/करते की मला शासकीय सेवेकरिता घोषीत केलेले नाही. तसेच मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझ्याविरुध्द कोणत्याही प्रकारची शिस्तभंगाची कार्यवाही/फौजदारी न्यायालयामध्ये खटला प्रलंबित प्रस्तावित नाही.

मी याद्वारे शपथपूर्वक असेही घोषित करतो/करते की अर्जामध्ये नमूद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी/चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषीत केले जाईल आणि जर निवड/नेमणूक झाल्यास, माझी सेवा कोणतीही सूचना दिल्याविना समाप्त केली जाईल याची मला जाणीव आहे.

तसेच दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्मलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा जास्त असल्यास मला सदर पदावरुन अपात्र ठरविण्यात येईल.

उमेदवारी अर्ज सादर केला म्हणून मला चाचणी/मुलखतीस बोलाविले जाण्याचा अधिकार प्राप्त नाही याची मला जाणिव आहे.

दिनांक :- ............................

उमेदवाराची स्वाक्षरी.

ठिकाण :- ............................

उमेदवाराचे नाव.